# मुंबई म्युनिसिपल पेन्शनर्स असोसिएशन

सोसायटी रजिस्ट्रेशन अधिनियम १९७४ चा क्र. २९०/४ जी.बी.बी.एस.डी आणि मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० (सन १९५० चा मुंबई अधिनियम क्र. २९) अन्वये दि. ३१–१२–१९७४ चा क्र. एफ ३५१० (मुंबई)

**कार्यालय**

जी–उत्तर महापालिका विभाग कार्यालय इमारत, खोली क्र. ९, तळमजला,

हरिश्चंद्र येलवे मार्ग, प्लाझा सिनेमाच्या जवळ, दादर (प), मुंबई– ४०००२८.

दूरध्वनी : २४३९७९३३, २४३९७८००, २४३६७९७०

ई मेल :–mmpasso739@gmail.com

## * संलग्न संस्था *

१) ऑल इंडिया फेडरेशन ऑफ पेन्शनर्स असोसिएशन, मद्रास.

२) ऑल इंडिया सेंट्रल कमिटी ऑफ पेन्शनर्स असोसिएशन, नवी दिल्ली.

३) भारत पेन्शनर्स समाज, नवी दिल्ली. ४) महाराष्ट्र पेन्शनर्स असोसिएशन, पुणे.

५) इंडियन फेडरेशन ऑन एजिंग, मुंबई.

# ४८ वा वार्षिक अहवाल

# २०२१–२०२२

# मुंबई म्युनिसिपल पेन्शनर्स असोसिएशन
## वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

मुंबई म्युनिसिपल पेन्शनर्स असोसिएशनची ४८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा, **रविवार, दि.११.०९.२०२२ रोजी ठीक दुपारी ४.०० वाजता दत्तमंदिर सभागृह, शारदाश्रम विद्या मंदिर, भवानी शंकर रोड, दादर (पश्चिम), मुंबई ४०००२८** ह्या ठिकाणी आयोजित करण्यात आली आहे. सभेत खाली नमूद केलेल्या विषयावर विचार विनिमय करून निर्णय घेण्यात येतील. सर्व सदस्यांना विनंती करण्यांत येत आहे की, त्यांनी सभेला वेळेवर हजर राहून सभेत सहभाग घ्यावा.

**कार्यक्रम पत्रिका**

१) मागील (४७) व्या वार्षिक सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. (मागील वर्षी वार्षिक सभा, रविवार, दि.२७ मार्च, २०२२ रोजी आयोजित केली होती.)

२) ४८ वा वार्षिक अहवाल, लेखा परिक्षीत जमा खर्च, ताळेबंद वाचून (१ एप्रिल २०२१ ते ३१ मार्च २०२२) मंजूर करणे.

३) सन २०२२-२०२३ ह्या आर्थिक वर्षासाठी अंदाज पत्रक मंजूर करणे.

४) सन २०२२-२०२३ ह्या वर्षासाठी मानद अंतर्गत हिशेब तपासनीसाची निवड करणे.

५) सन २०२२-२०२३ चे हिशेब तपासण्यासाठी सनदी लेखापाल यांची नेमणूक करणे.

६) घटनेचा सुधारित प्रस्तावित मसुदा अंतिमतः मंजूर करणे. (घटनेचा मसुदा दि.२७ मार्च,२०२२ च्या वार्षिक सभेत प्रथमतः सादर करून पहिल्यांदा मंजूर करण्यात आला होता.)

७) अध्यक्षांचे परवानगीने आयत्या वेळी उपस्थित होणाऱ्या विषयाबाबत साधक बाधक विचार विनिमय करणे.

**मुंबई** सही /-

**दिनांक : ११.०८.२०२२** **डॉ.मारूती नलावडे**

**टीपः** **कार्यवाह**

१) संस्थेचा पत्रव्यवहार, ४७ व्या वार्षिक सभेचे इतिवृत्त, लेखा परिक्षीत जमा खर्च, ताळेबंद इ. कागदपत्रांची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी, संबंधित अभिलेख दि.०१.०९.२०२२ ते दि.१०.०९.२०२२ या कालावधीत (शनिवार, रविवार व सुट्टीचे दिवस वगळून) संस्था कार्यालयात दु.२:३० ते सायं ४:३० या वेळेत उपलब्ध करून देण्यात येईल.

२) ज्या सदस्यांना ठराव मांडावयाचा असेल त्यांनी त्या ठरावाची प्रत, सभेच्या दिनांकापूर्वी किमान सात दिवस आधी पाठवावी. ठराव पाठविताना त्यावर सचक व अनुमोदक ह्यांच्या सह्या आवश्यक आहेत.

३) सभेच्या नियत वेळी गणपूर्ती न झाल्यास सदर सभा अर्धा तास कालावधीसाठी तहकूब करण्यात येईल व त्यानंतर उपस्थित गणपूर्ती पुरेशी आहे असे मानून, सभेला सुरूवात करून, कार्यक्रम पत्रिकेवरील सर्व विषयांवर सभेत निर्णय घेण्यात येतील.

४) वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस, वार्षिक अहवाल, घटनेचा प्रस्तावित मसुदा, लेखापरिक्षित जमाखर्च व ताळेबंद ई-मेल व्दारा पाठवण्यात आला आहे. तसेच दि.११.०९.२२ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना दै.सामना मध्ये प्रकाशित करण्यात येत आहे.

## विद्यमान कार्यकारिणी सन २०२२ ते २०२५

### कार्यकारी मंडळाचे सदस्य : कालावधी : १ एप्रिल २०२२ ते ३१ मार्च २०२५

| | सदस्य | पद | भ्रमणध्वनी/दूरध्वनी |
|---|---|---|---|
| १ | श्री.कमलाकर क्षीरसागर | अध्यक्ष | ९८१९१३८२५४ |
| २ | श्री.वामन कुटुंबे | उपाध्यक्ष | ९८१९०३२७७३ |
| ३ | श्री.अनंत काजरोळकर | उपाध्यक्ष | ९८३३१४१२८३ |
| ४ | श्री.महादेव सोहनी | उपाध्यक्ष | ९८९२२८८४४९ |
| ५ | डॉ.मारुती नलावडे | कार्यवाह | ९८६९७२२२३८ |
| ६ | श्री.हेमंत पटवर्धन | खजिनदार | ९१६७९५१४९९ |
| ७ | श्रीम.प्रतिमा पवार | संयुक्त कार्यवाह | ९९८७७७९९५७ |
| ८ | श्री.जयंत.दातार | संयुक्त कार्यवाह | ९८६९६७२३७१ |
| ९ | श्री.शिवराम अतकरी | संयुक्त कार्यवाह | ९८९२९१६३२४ |
| १० | श्री.चंद्रशेखर फडके | सह खजिनदार | ९६१९७४९९६४ |

## कार्यकारिणी सदस्य

| | | | |
|---|---|---|---|
| ११ | श्री.दिलीप कंरदीकर | डोंबिवली (कार्यालय प्रमुख) | ९८३३८५६८५२ |
| १२ | श्री.विजयकुमार पोतदार | बदलापूर | ९७६६५२५२६७ |
| १३ | श्री.रमेश राणे | बोरीवली | ९८६९०६६५२३ |
| १४ | श्रीम.शोभना पाटील | कुर्ला | ९७५७३०१२८५ |
| १५ | श्री.दिलीप मा.साळवी | गिरगाव | ९८६९६५५८३५ |
| १६ | श्रीम.हेमलता हटकर | वसई | ९१३७०६१८०३ |
| १७ | श्रीम.कोन्सेसाव डिमलो | वसई | ८००७३५४६४० |
| १८ | श्री.सुरेश सावंत | बोरीवली | ९८६९१८६८१२ |
| १९ | श्री.अशोक जाधव | नवी मुंबई | ९९६७८३८४४७ |
| २० | श्रीम.शिल्पा पटवर्धन | कल्याण | ९८२०३३६५७६ |
| २१ | श्री.चंद्रकांत तळेले | कल्याण | ९९८७२७३०२० |

* श्री. अ.म.कामेरकर, अंतर्गत हिशेब तपासनीस, दूरध्वनी: ९९८७५४९५३०

** श्री.निलेश म्हापसेकर, चार्टर्ड अकाऊंटंट, वैधानिक हिशेब तपासनीस, दूरध्वनी: २४७१०८७१

| अनु क्र | निमंत्रित सदस्य | | भ्रमणध्वनी/दूरध्वनी |
|---|---|---|---|
| १ | श्री. ए.शं.कावतकर | दादर | ९९२०६४९८०८ |
| २ | श्री. अनिलराज कवेस्कर | नवी मुंबई | ९१६७८२५८३८ |
| ३ | श्रीम. शिल्पा नाईक | चेंबूर | ९८२०२२२०७५ |
| ४ | श्रीम. अदिती पांजरी | गिरगाव | ९३२३५६४६२४ |
| ५ | श्री. जॉन गोन्सालवीस | वसई | ९३२२७५८८०४ |
| ६ | श्री. गंगाराम पवार | बोरीवली | ८१०४९३०४९२ |
| ७ | श्री. किरण पोतदार | वसई | ९८२०५७७२९७ |
| ८ | श्री. देविदास आ.बधान | मुलुंड | ९९८७५५३५६६ |
| ९ | श्री. श्रीनिवास शेंडुरकर | बोरोवली | ९८६९०५२८८८ |
| १० | श्री. शिरीष शुक्ल | डोंबिवली | ९९२०६०९३११ |
| ११ | श्रीम. मंजिरी गांवकर | दादर | ९८६९४०३४८३ |
| १२ | श्रीम. नीता मांजरेकर | मालाड | |
| १३ | श्रीम. अनुजा आचरेकर | गिरगाव | ९८३३१९२८२१ |
| १४ | श्री. प्रमोद कुलकर्णी | डोंबिवली | ९९६९००६३०९ |
| १५ | श्री. काशीनाथ पाटील | वसई | ९८२३४२४९६९ |
| १६ | श्री. अनंत पाटील | वसई | ९८९२३४६५६२ |
| १७ | श्री. रविंद्र तोंडुलकर | मुलुंड | ९९३००६१०६६ |
| १८ | श्रीम. माधवी शेंडये | गोरेगाव | ९९३०२१४३७७ |

कार्यालयोन कर्मचारी

श्रीम.रागिणी गुरव :–लिपीक

श्री.प्रकाश खर्डे :–सहाय्यक

# मुंबई म्युनिसिपल पेन्शनर्स असोसिएशन

## ४८ वा वार्षिक अहवाल : वर्ष २०२१–२२

सर्व सभासद बंधू भगिनींनो !

आपल्या असोसिएशनचा ४८ वा वार्षिक अहवाल आपल्या हाती सुपूर्द करतांना कार्यकारिणीला आनंद तसेच अभिमान वाटतो. अहवाल वर्षातील ठळक बाबींचा उल्लेख पुढील प्रमाणे

**१) मासिक सभा / वार्षिक सर्वसाधारण सभा :**

अहवाल वर्षात कार्यकारिणीच्या एकूण १० सभा संपन्न झाल्या, उपरोक्त सर्व सभांना कार्यकारिणी सदस्य/निमंत्रित सदस्य यांची उपस्थिती १०० % होती. रविवार दि.२७.मार्च २०२२ रोजी सन २०२२–२३ ची वार्षिक सर्वसाधारण सभा शारदाश्रम विद्यामंदिर, दादर येथे संपन्न झाली.

**२) सभासद संख्या :**

वृत्तांत साली एकूण **२४४** नवीन सभासद संस्थेस जोडले गेले आहेत. वृत्तांत वर्षा अखेर, पटावर खाली नमूद केल्याप्रमाणे **२२९८९** सभासद होते.

| सभासद | १.४.२०२१ रोजी पटावर असलेले सभासद | नवीन झालेले सभासद | निधन झालेल्या सभासदांची संख्या | एकूण दि.३१.०३.२०२२ रोजी सभासद संख्या |
|---|---|---|---|---|
| आश्रयदाते सभासद | २२७५७ | २४४ | १२ | २२९८९ |

**३) कार्यकारिणीची निवड / निवडणूक ( दि.१ एप्रिल, २०२२ ते दि.३१ मार्च, २०२५ साठी ) :**

कार्यकारिणीची मुदत दि.३१ मार्च २०२१ रोजी संपुष्टात आली होती. मंगळवार दि.३० मार्च, २०२१ रोजी झालेल्या ४६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत नूतन कार्यकारिणीची निवड होणे अभिप्रेत होते. परंतु कोविद–१९ च्या महामारीमुळे ४६ वी वार्षिक सभा प्रत्यक्ष न होता ती झूमव्दारा घेण्यात आली. त्यामुळे त्या सभेत कार्यकारिणीची निवड/ निवडणूक शक्य होऊ शकली नाही. सबब विद्यमान कार्यकारिणीस, एक वर्षाची मुदतवाढ दि.३१.०३.२०२२ पर्यंत मंजूर करण्यात आली होती.

रविवार दि.२७ मार्च, २०२२ रोजी संस्थेची ४७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शारदाश्रम विद्यामंदिर, दादर येथे संपन्न झाली. सदर सभेत दि.०१ एप्रिल, २०२२ ते दि.३१ मार्च, २०२५ या तीन वर्षाच्या कालावधीसाठी कार्यकारिणीची एकमताने निवड करण्यात आली. या सभेत १ अध्यक्ष, ३ उपाध्यक्ष व १७ सदस्यांची निवड करण्यात आली. त्याचा तपशील पृष्ठ क्र. ४ व ५ वर सादर केला आहे.

**४) सभासद नोंदणी :**

कोवीद–१९ च्या महामारीमुळे असोसिएशनचे कार्यालय अनेक महिने बंद होते. त्यामुळे नियमित कामकाज होऊ शकलेले नाही. त्याचा परिणाम नवीन सभासद नोंदणी व इतर अनेक कार्यक्रमांवर झालेला आहे. आता हळूहळू सर्व गोष्टी नियमितपणे सुरू झालेल्या आहेत.

सभासदांना आवाहन करण्यात येते की, प्रत्येकाने सेवानिवृत्त कामगार/कर्मचारी/अधिकारी यांच्याशी संपर्क साधून नवीन सभासद नोंदणीसाठी प्रयत्न करावेत, व संस्थेची ताकद वाढवावी. सभासद वर्गणीचे दर पुढीलप्रमाणे आहेत.

- **प्रथम सभासद होताना :रू ३१०/– (रू.३००/– अधिक रू.१०/–प्रवेश फी)**
- **दरवर्षी वार्षिक वर्गणी :रू १५०/–** } **प्रतिवर्षी निवृत्ती वेतनातून परस्पर वळती केली जाते**
- **दरवर्षी वैद्यकीय साहाय्य वर्गणी :रू २००/–** }

मुंबई महानगरपालिकेतील निवृत्त वेतनधारक/कुटुंब निवृत्ती वेतनधारकांची संख्या सुमारे १.२५ लक्ष इतकी असून असोसिएशनची सभासदसंख्या फक्त २२९८९ इतकी असून हे निश्चितच समाधानकारक नाही. तरी सर्व

सभासदांनी सदस्य नोंदणीसाठी सक्रीय सहभाग घ्यावा असे आवाहन करत आहोत. **" सभासद नोंदणीची चळवळ हाती घेऊया, संघटन शक्ती वाढवूया ''** अशी अपेक्षा करत आहोत.

**५) महागाई भत्ता वाढ :**

महापालिका कर्मचाऱ्यांबरोबरच निवृत्तीवेतन/कुटुंब निवृत्तीवेतनधारकांनाही दरवर्षी १ जानेवारी व १ जुलै पासून महागाई भत्त्यात वाढ दिली जाते. त्यानुसार ७ व्या वेतन आयोगानुसार वेळोवेळी वाढलेल्या महागाई भत्त्याच्या दराचा तक्ता माहिती प्रयोजनार्थ सादर करीत आहे.

**महागाई भत्ता वाढीच्या दराचा तपशील (७ व्या वेतन आयोगानुसार)**

| | |
|---|---|
| ०१ जानेवारी २०१६ ते ३० जून २०१६ | ० % |
| ०१ जुलै २०१६ ते ३१ डिसेंबर २०१६ | २ % |
| ०१ जानेवारी २०१७ ते ३० जून २०१७ | ४ % |
| ०१ जुलै २०१७ ते ३१ डिसेंबर २०१७ | ५ % |
| ०१ जानेवारी २०१८ ते ३० जून २०१८ | ७ % |
| ०१ जुलै २०१८ ते ३१ डिसेंबर २०१८ | ९ % |
| ०१ जानेवारी २०१९ ते ३० जून २०१९ | १२ % |
| ०१ जुलै २०१९ ते ३१ डिसेंबर २०१९ | १७ % |
| ०१ जानेवारी २०२० ते ३० जून २०२० | १७ % |
| ०१ जुलै २०२० ते ३१ डिसेंबर २०२० | १७ % |
| ०१ जानेवारी २०२१ ते ३० जून २०२१ (प्रत्यक्ष अमलबजावणी जुलै,२१ पासून) | २८ % |
| ०१ जुलै २०२१ ते ३१ डिसेंबर २०२१ | ३१ % |
| ०१ जानेवारी २०२२ ते ३० जून २०२२ | ३४ % |

**महागाई भत्ता, मूळ निवृत्तीवेतनावर देण्यात येतो याची कृपया नोंद घ्यावी.**

**६) वैद्यकिय सहाय्य निधी योजना :**

अनेक वर्षांपासून संस्थेतर्फे चालवली जाणारी ही वैशिष्टयपूर्ण अशी योजना आहे. या योजनेची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे

* या योजनेचे सभासदत्व मिळाल्यापासून, ३ वर्षांचा कालावधी पूर्ण झाल्यानंतरच्या आजारपणासाठी स्वतः सभासद किंवा त्याचे जोडीदारास (पती किंवा पत्नी) आर्थिक सहाय्यासाठी अर्ज करता येतो.
* खर्च केलेल्या रकमेच्या २० % किंवा जास्तीत जास्त रू.४०,०००/- एवढे आर्थिक साहाय्य निधी उपलब्धते सापेक्ष मंजूर केले जाते.
* विहीत नमुन्यातील छापील अर्जासोबत रूग्णालयाचे ॲडमिशन/ डिस्चार्ज कार्ड, डॉक्टरांचे निदान, शस्त्रक्रियेची माहिती याचे प्रमाणपत्र, हॉस्पीटलचा खर्च व बीले यांच्या मूळ प्रती जोडणे अनिवार्य आहे. हॉस्पिटलचा खर्च रू. २ लाखापेक्षा जास्त असल्यास इतर बिलांची आवश्यकता नाही.
* किमान वैद्यकिय खर्च रू.४०,०००/- होणे अनिवार्य आहे. त्याच्या २० % किंवा अधिकतम रू.४०,०००/- एवढी रक्कम संपूर्ण सभासदत्व कालावधीसाठी मिळू शकेल.
* अर्जासोबत स्वयंसाक्षांकित पॅनकार्ड, आधारकार्ड तसेच चेकची झेरॉक्स प्रत किंवा रद्द धनादेश जोडावा.
* या योजनेचा फायदा घेतल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत असोसिएशनचे सभासदत्व रद्द करता येणार नाही. संबंधितांने या योजनेची वार्षिक वर्गणी आजीवन भरणे जरूरीचे आहे.
* इतर विमा कंपन्या, संस्था, इ.कडून मदत घेतली असल्यास व त्यांचेकडून प्राप्त प्रतिपूर्ती रकमेपेक्षा जास्त खर्च झाल्यास ज्यादा खर्चावरील रकमेच्या २० % प्रमाणे या योजनेंतर्गत प्रतिपूर्ती केली जाईल, अशा प्रसंगी बिलांच्या स्वसाक्षांकित प्रती जोडाव्यात.

* या योजनेंतर्गत वैद्यकिय समिती तसेच असोसिएशनच्या कार्यकारिणीने मंजूर केलेले निर्णय अंतिम व सर्वांना बंधनकारक असतील.
* जास्तीत जास्त गरजूंना या योजनेचा फायदा करून देणे, हे संस्थेचे उद्दिष्ट आहे त्यानुसार सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे.
* या अहवाल वर्षात वैद्यकीय सहाय्यासाठी एकूण ५३ अर्जांना मंजूरी देण्यात येवून एकूण रू.११,०४,४००/- इतक्या रकमेचे अधिदान करण्यात आले आहे.

## ७) ७ व्या वेतन आयोगाची अंमलबजावणी :

सर्व निवृत्तीवेतन धारक/कुटुंब निवृत्तीवेतन धारकांना ७ व्या वेतन आयोगानुसार निवृत्ती वेतन मिळत आहे. काही कारणांमुळे काही अपवाद नाकारता येत नाही. जानेवारी, २०१६ नंतर निवृत्त झालेल्या निवृत्तवेतनधारकांनी ७ व्या वेतन आयोगानुसार निवृत्ती मिळत नसल्यास आपापल्या आस्थापनेशी संपर्क साधून वेतन निश्चिती पत्रके पडताळणी करून घ्यावीत. याबाबत काही अडचणी उद्भवल्यास असोसिएशनशी संपर्क साधावा.

सातव्या वेतन आयोगाची थकबाकी पुढील प्रमाणे देण्यात आली आहे.

पहिला हप्ता : एकूण थकबाकीच्या ५०%

दुसरा हप्ता : राहिलेल्या ५०% मधील १/३ हिस्सा

तिसरा हप्ता : राहिलेल्या ५०% मधील १/३ हिस्सा

चौथा हप्ता : राहिलेल्या ५०% मधील १/३ हिस्सा जून पेड इन जुलै, २०२२ मध्ये प्राप्त झाला आहे.

## ८) दि.०१.०४.२००० पूर्वी निवृत्त झालेल्या निवृत्तांची थकबाकी मिळण्यासाठी पाठपुरावा.

उपरोक्त विषयीची याचिका क्र २५९८/२०१६ मान. उच्च न्यायालयाने दि. १५.०२.२०१९ रोजो निकाली काढली असून संबंधितांना थकबाकी देण्याचे आदेश दिलेले आहेत. परंतु दुर्दैवाने महानगरपालिका त्याच्या विरोधात मान. सर्वोच्च न्यायालयात गेली आहे. असोसिएशनच्या वतीने क्र. SLP ( c )/24360/2019 ही याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल केली आहे. परंतु कोवीद- १९ च्या महामारीमुळे केस बोर्डावर येत नाही. सदर याचिका बोर्डावर लवकरात लवकर येण्यासाठी असोसिएशन, ॲडव्होकेटमार्फत सातत्याने पाठपुरावा करत आहे. सर्वोच्च न्यायालयातही, असोसिएशन १००% जिंकेल असा विश्वास वाटतो.

## ९) हयातीचा दाखला :

हयातीचे दाखले सादर करण्याची मुदत दरवर्षी १ नोव्हेंबर ते ५ फेब्रुवारी पर्यंत असते. कोवीद- १९ ची महामारी लक्षात घेऊन असोसिएशनने महापालिककड सातत्याने पाठपुरावा करून ही मुदत ५ मार्चपर्यंत करून घेतली होती. त्याचप्रमाणे पोस्टाव्दारे, कुरिअरव्दारे तसेच प्रत्येक वॉर्डच्या ड्रॉप बॉक्समध्ये टाकणे, अशाही सोयी उपलब्ध करून दिल्या होत्या. गतवर्षी अनेकांनी हयातीचे दाखले असोसिएशनच्या मदतीने जीवनप्रमाण प्रणालीव्दारे सादर केले होते. असोसिएशनने आपल्या स्तरावरून दादर, डोंबिवली, कल्याण, बदलापूर, कर्जत, मुलुंड, वसई शाखे मार्फत अनेक निवृत्तांना हयातीचे दाखले जीवनप्रमाण प्रणालीव्दारा सादर करण्यासाठी सहाय केले आहे. सदर बाबतीत श्री.केळकर, श्री.बधान, श्री.काशीनाथ पाटील, श्री.दातार, श्री.क्षीरसागर, श्रीम.पटवर्धन, श्री.विजय पोतदार, श्रीम.हटकर इ.नी मोलाची भूमिका पार पाडली आहे. या कामी श्रीम.रागिणी गुरव यांनी सक्रिय सहभाग दिला आहे. दरवर्षी असोसिएशनच्या वतीने सर्व शाखांमार्फत जोवनप्रमाण प्रणालीव्दारा हयातीचे दाखले सादर करण्यासाठी मदत केंद्र उभारण्याचा संस्थेचा मानस आहे. मात्र यासाठी विभागीय कार्यकर्त्यांच्या सहकार्याची गरज आहे.

जीवनप्रमाण प्रणालीव्दारा हयातीचे दाखले सादर करतांना पुढील बाबी कटाक्षाने पाळाव्यात असे आवाहन आहे.

- **पेमेंट ऑर्डर क्र. ज्या जागी आपला कर्मचारी संकेतांक नमूद करणे अत्यावश्यक आहे. PPO क्र. नमूद करू नये. सॅप संगणकीय प्रणाली इ सी नंबर/कर्मचारी संकेतांकावर चालते.**
- **आधार क्रमांक, जन्मतारीख, मोबाईल क्र. अचूक नमूद करावा.**
- **बँकेची माहिती : खाते क्रमांक, आय एफ एस सी इ. माहिती अचक भरावी.**

१०) पेन्शन अदालत :

पेन्शन विषयक तक्रारीचे निवारण करण्यासाठी खात्यांतर्गत तसेच केंद्रीय स्तरावर पेन्शन अदालती कार्यरत आहेत. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे.

**प्रमुख लेखापाल (कोषागार) ई–विभाग यांचे कार्यालयः** प्रत्येक महिन्याचा दुसरा मंगळवार, सकाळी ११:००वा. असोसिएशनच्या वतीने श्री.देवी गुजर, मोबाईल क्र. ८४३३८२२२०१ व श्रीम. प्रतिमा पवार, (संयुक्त कार्यवाह) मोबाईल क्र. ९९८७७७९९५७ श्री.शिवराम अतकरी मोबाईल क्र.९८९२९१६३२४ हे अदालतीत नियमीत उपस्थित राहून समस्यांचे निराकरण करण्याचा प्रयत्न करत असतात. त्यामळे संबंधितांनी त्यांच्याशी संपर्क साधावा.
त्यांनी अनेक निवृत्तांचे प्रश्न धसास लावले आहेत. त्यांचे संस्थेच्या वतीने खास अभिनंदन !

११) पेन्शन स्लीप :

निवृत्तांना दरमहा पेन्शन स्लीप ई–मेल व्दारा प्राप्त होत आहे. अजूनही अनेकांना पेन्शन स्लीप मिळण्यात अडचणी आहेत. असोसिएशनने शेकडो पेन्शन धारकांना ई–मेल व्दारा पे स्लीप मिळवून देण्यासाठी सहकार्य केले आहे.

अद्यापही ज्यांना पेन्शन स्लीप मिळत नाही. त्यांनी ई–मेल व्दारा आपले अर्ज **ao.penib@mcgm.gov.in** या ई–मेल पत्त्यावर पाठवावेत. अर्जात पुढील गोष्टी नमूद कराव्यात. **स्वतःचे नांव, कर्मचारी संकेतांक, मोबाईल क्र. व ई–मेल आयडी** (२५ कॅरेक्टर पेक्षा जास्त नसावा.) तसेच पे स्लीप न मिळाल्यास ०२२–२२६२०२५१/ ०२२–२२७५४००० विस्तारीत क्र. ४०३४ या क्रमांकावर संपर्क साधावा. पे स्लीप त्वरीत पाठवली जाते असा अनुभव आहे.

१२) निवृत्ती वेतन विभाग :

महापालिकेच्या प्रमुख लेखापाल (कोषागार) यांचे कार्यालय महापालिकेच्या ई–विभाग कार्यालयातील ३ रा मजला, साखळी स्ट्रीट, भायखळा (प), मुंबई–४००००८ येथे कार्यरत आहे. निवृत्ती वेतन विषयक सर्व कामांसाठी येथे संपर्क करावा.
**संपर्क क्र. :– ०२२–२३०८१४७१/७२/७३.**

१३) अंशराशीकरण रकमेचे अधिदान ( **Comutation Amount** ) :

निवृत्ती वेतनापैकी ज्या निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण केलेले असेल व ती रक्कम ज्या तारखेला मिळाली असेल त्यानंतर १५ वर्षानी तेवढीच रक्कम निवृत्ती वेतनात समाविष्ट करण्यात येते. त्यासाठी कोणीही सभासदांनी असोसिएशनकडे किंवा निवृत्ती वेतन विभागाकडे अर्ज करण्याची आवश्यकता नाही. कृपया याबाबत **क्र.सा.प्र.वि/ एफ जी आर/ १६ दि.१९.१०.२००४** हे परिपत्रक पहावे.

१४) देणगीदार :

खाली नावे नमूद केलेल्या सभासदांनी / देणगीदारांनी, अहवाल वर्षात खाली नमूद केल्याप्रमाणे देणगी स्वरूपात आर्थिक सहकार्य केले आहे.

दि.१ एप्रिल,२०२१ ते दि.३१ मार्च, २०२२ या कालावधीतील देणगीदारांचा तपशील

| अनु क्र | सभाससद /देणगीदारांचे नांव | रक्कम |
|---|---|---|
| १ | श्रीम. मंजीरी श्रीकांत गोडसे | १०,०००/- |
| २ | श्रीम. नयन मानगावकर | ५,५५५/- |
| ३ | श्री. शशीकांत सदाशीव राण | ५,२६८/- |
| ४ | श्रीम. सुगंधा सुरेश कोरगावकर | ५,००१/- |
| ५ | श्रीम. शोभना वझे | ५,०००/- |
| ६ | श्री. अनंत रघुनाथ वीरकर | ५,०००/- |
| ७ | श्रीम. रागीणी अनंत वीरकर | ५,०००/- |
| ८ | श्रीम. छाया कांचन चित्रे | ५,०००/- |
| ९ | श्री. सुनिल भास्कर धर्माधीकारी | ५,०००/- |
| १० | नीता नायर डीएसपी मुच्युल फंड | ५,०००/- |
| ११ | श्रीम. सुषमा लाड | ३,०००/- |
| १२ | श्री. रमेश शंकर कदम | २,००१/- |
| १३ | श्रीम. माधवी मुकुंद शेंडये | २,०००/- |
| १४ | श्रीम. भोरकर | २,०००/- |
| १५ | श्रीम. हेमलता रामचंद्र मोदी | २,०००/- |
| १६ | श्री. परशुराम अनंत काजरेकर | १,१११/- |
| १७ | श्री. सुरेश महाजन | १,००१/- |
| १८ | श्रीम. इंदूमती धाकरस | १,०००/- |
| १९ | श्रीम. अनुराधा आपटे | १,०००/- |
| २० | श्री. कमलाकर क्षीरसागर | १,०००/- |
| २१ | श्री. अशोक यशवंत जोशी | १,०००/- |
| २२ | श्री. प्रकाश वसंत फणशीकर | १,०००/- |
| २३ | श्रीम. सुचीता सुरेश बोडस | १,०००/- |
| २४ | डॉ. सुप्रिया हरी जोग | १,०००/- |
| २५ | श्रीम. चारूलता मुकण | ५००/- |
| २६ | श्रीम. प्रज्ञा मालवदे | ५००/- |
| २७ | श्रीम. वंदना आठवले | ५००/- |
| २८ | श्रीम. मेघना रमेश फडके | ५००/- |
| २९ | श्री. गजानन भाऊराव शेलार | ५००/- |
| ३० | श्रीम. माकडवाला | ५००/- |

## सर्व देणगीदारांचे मनःपूर्वक आभार !

असोसिएशनमार्फत अनेक सभासदांच्या समस्यांची सोडवणूक करण्यात येते. याशिवाय विविध केंद्रस्थानी प्रतिवर्षी हयातीचे दाखले देण्यासाठी मेळावे आयोजित करणे, सभासदांना निवृत्तीवेतन विषयक तसेच आयकर, गुंतवणूक, मृत्यूपत्र, फिटनेस, इ. विषयी मार्गदर्शन करणे, सांस्कृतिक, सामाजिक उपक्रम आयोजित करण्यात येतात. आपल्या संस्थेला प्रशासनाकडून / शासनाकडून कोणत्याही स्वरूपाचे आर्थिक साहाय्य, अनुदान, सवलत प्राप्त होत नाही. उलट उच्चतम दराने आयकर भरावा लागतो. संस्थाकार्य जास्त गतीमान, परिणामकारक व्हावे यासाठी सर्व सभासदांचे सहकार्य प्रार्थनीय आहे. म्हणून सर्व संबंधित सभासदांना असे आवाहन करण्यात येते की, त्यांनी यथाशक्ती संस्थेला देणगी देऊन संस्थेला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यात यावे. जेणे करून आणखी नवनवीन उपक्रम संस्थेला सुरू करता येतील. अहवाल वर्षात स्वेच्छेने देणगी देणाऱ्या सर्व सभासदांची संस्था ऋणी आहे.

### १५) निवृत्ती वेतन / कुटुंब निवृत्ती वेतनाचे दावे निकाली काढणे :

कोवीद–१९ च्या महामारी कालखंडात हजारो कर्मचारी सेवानिवृत्त झालेले आहेत. तसेच अनेक निवृत्ती वेतनधारकांचे निधन झालेले आहे. अशा अनेक निवृत्ती वेतनधारकांचे तसेच कुटुंब निवृत्ती वेतनधारकांचे वेतन दावे प्रशासनाचे स्तरावर विविध कारणांमूळे प्रलंबित आहेत.

महापालिका प्रशासनाशी सातत्याने संपर्क साधून, त्याचा पाठपुरावा करून अनेक निवृत्ती वेतनधारकांचे दावे निकाली काढण्यासाठी संस्थेच्या वतीने श्रीम.प्रतिमा पवार, श्री.कमलाकर क्षोरसागर व श्री.शिवराम अतकरी इ. नी मोलाची कामगिरी बजावली आहे. त्यांचे संस्थेतर्फे विशेष अभिनंदन !

आता संस्थेचे कार्यालय पूर्ण क्षमतेने सुरू झाले आहे. सर्व पदाधिकारी वेळोवेळी कार्यालयात येवून निवृत्तांच्या समस्या पूर्ण क्षमतेने सोडवण्याचा प्रयत्न करत असतात. अशा सर्व पदाधिकाऱ्यांचे संस्थेतर्फे विशेष अभिनंदन.
श्रीम.रागिणी गुरव, श्री. कावतकर, श्री.प्रकाश हे दररोज कार्यालयात उपस्थित राहून आपली जबाबदारी सक्षमपणे पार पाडतात, त्यांचेही अभिनंदन !

### १६) संस्थेची विभागीय कार्यालये :

सभासदांशी चर्चा करणे, सुसंवाद साधणे, विविध विषयी त्यांना मार्गदर्शन करणे, यथाशक्ती साहाय्य करणे. समस्या सोडवणे, इ.कार्यासाठी आठवडयातून एक दिवस संबंधित विभागातील कार्यकर्ते / पदाधिकारी एकत्र जमतात. काही स्थानी जागा मिळाल्या आहेत. अन्यथा आपले कार्यकर्ते, त्यांच्या घरूनच संस्था कार्य करत आहेत. त्याबाबतची माहिती खालील प्रमाणे आहे.

| अनु क्र | विभाग | स्थळ | वेळ व दिवस | कार्यकत्यांचे नांव | संपर्क क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | **मुलुंड विभाग** | टी–वॉर्ड कार्यालय, कक्ष क्र.२० (सभागृह), पहिला मजला, मुलुंड–४०००८० | मंगळवारः सायं ४:०० ते ५:३० | श्री.अनंत केळकर,<br>श्री.शिवराम अतकरी<br>श्री. बधान श्री.सावंत | ९८६९४०२२६३<br>९८९२९१६३२४<br>९९८७५५३५६६<br>९८२०६३०६४६ |
| २ | **बोरीवली विभाग** | आर (मध्य) विभाग कार्यालय, नवीन ईमारत, १ ला मजला, बोरीवली (प) | शनिवारः सायं. ४:०० ते ५:३० | श्री.प्रकाश जोशी<br>श्री.सुरेश सावंत<br>श्री.गंगाराम पवार,<br>श्री.रमेश राणे | ८२९१८४२६४४<br>९८६९१८६८१२<br>८१०४९३०४९२<br>९८६९०६६५२३ |
| ३ | **वसई विभाग** | कुलकर्णी हॉल, वसई (प) | सायं.४:०० ते ६:०० दर महिन्याचा १ला बुधवार | श्री.काशिनाथ पाटील<br>श्रीम.हेमलता हटकर<br>श्री.अनंत पाटील<br>श्रीम.कोन्सेसाव डिमेलो | ९८२३४२४९६९<br>९१३७०६१८०३<br>९८९२३४६५६२<br>८००७३५४६४० |
| ४ | **डोंबिवली विभाग** | क्रीडा भवन, व्ही.पी रोड, पेंडसे नगर, डोंबिवली (पूर्व) | शनिवारः सायं ५:१५ ते ६:३० | श्री.दिलीप करंदीकर<br>श्री.जयंत दातार<br>श्री.चंद्रशेखर फडके<br>श्री.हेमंत पटवर्धन | ९८३३८५६८५२<br>९८६९६७२३७१<br>९६१९७४९९६४<br>९१६७९५१४९९ |
| ५ | **कल्याण विभाग** | – | – | श्रीम.शिल्पा पटवर्धन<br>श्री.श्रीराम कुलकर्णी<br>श्री.विनायक मोघे<br>श्री.अभय चौबळ<br>श्री.रविंद्र बावीस्कर | ९८२०३३६५७६<br>९८३३५८९३४०<br>९८११९२०४९३<br>९९२०५७५७३१<br>९००४३९०७२७ |
| ६ | **बदलापूर विभाग** | काबुराम कॉम्पलेक्स ओ विंग वाणी आळी, विठ्ठल मंदिराजवळ,<br>बदलापूर (पूर्व), जि.ठाणे –४२१५०३ | – | श्री.विजयकुमार पोतदार<br>श्री.के एन राजपूत<br>श्री.एस.एन.कांबळे,<br>श्री.विश्वनाथ जाधव | ९७६६५२५२६७<br><br>८६९८७३१३७६<br>९४२३२३११३४<br>९८१९५९२९६९ |
| ७ | **कर्जत विभाग** | – | – | श्री.रामनाथ गांगल | ९४२३८९१३७९ |
| ८ | **नवी मुंबई** | – | – | श्री.अशोक जाधव | ९९६७८३८४४७ |

१७) दि.१ एप्रिल,२०२१ ते दि.३१ मार्च, २०२२ या कालावधीत निधन झालेल्या व संस्थेस माहिती प्राप्त झालेल्या दिवंगत सभासदांचा तपशील :

## सर्व दिवंगतांना संस्थेतर्फे भावपूर्ण श्रध्दांजली

| अनु क्र | दिवंगत सभासदाचे नावं | मृत्यू दिनांक |
|---|---|---|
| १ | श्रीम.मालती मधुसुदन गोखले | १९.०१.२०२१ |
| २ | श्रीम.सरूबाई गुलाब शेलार | २४.०६.२०२१ |
| ३ | श्री.हुसेन आब्बास मुजावर | २९.११.२०२१ |
| ४ | श्री. शांताराम शिवराम जाधव | १४.११.२०२१ |
| ५ | श्री.नरसिंह गणेश बिलवलकर | २७.०१.२०२२ |
| ६ | श्री. कल्लोळी कृष्णाजी नगर | २४.०१.२०२२ |
| ७ | श्रीम.गुलाब शांताराम तांडेल | १५.०१.२०२२ |
| ८ | श्री. चिंतामण सिताराम साठे | २५.१०.२०२१ |
| ९ | श्रीम.सविता सुर्यकांत तवसालकर | २२.०८.२०२१ |
| १० | श्री. मनोहर तुकाराम तळेकर | ०५.०२.२०२२ |
| ११ | श्रीम.सुमती बापू पालकर | २३.०१.२०२२ |
| १२ | श्रीम. सावंत मनिषा हीराजी | २३.११.२०२१ |

१८) लेखापरीक्षण :

**सर्व** श्री.दिलीप करंदीकर, जयंत दातार, हेमंत पटवर्धन यांनी लेखे परिक्षित करून सनदी लेखापाल व अंतर्गत हिशोब तपासनीस यांचेशी वारंवार संपर्क साधून, जमाखर्च, ताळेबंद इत्यादी तयार करून, घेऊन लेखापरीक्षण पूर्ण करून घेतले, त्याबद्दल त्या सर्वांचे संस्थेतर्फे विशेष अभिनंदन !

१९) आभार :

१. सहाय्यक आयुक्त (जी/एन) व त्यांचे कर्मचारी यांचे, मासिक सभासाठी सभागृह, इतर संलग्न सोई–सवलती, दूरध्वनी सेवा इ. उपलब्ध करून दिल्याबद्दल.
२. उपायुक्त (सा.प्र) अतिरिक्त आयुक्त, मनपा आयुक्त, प्रमुख लेखापाल (कोषागार व वित्त), उपप्रमुख लेखापाल (निवृत्ती वेतन कर्मचारी/प्रशासकीय सुधारणा) व त्यांचे खात्यातील सर्व कर्मचारी यांचे विविध समस्या सोडवण्यास सहकार्य केल्याबद्दल.
३. सनदी लेखापाल व चार्टर्ड अकाऊंटंट श्री.निलेश म्हापसेकर व अंतर्गत हिशोब तपासनीस श्री.अ.म.कामेरकर यांचे सन २०२०–२०२१ चे लेखा परिक्षण व मार्गदर्शन.
४. दैनिक नवाकाळ, दैनिक सामना या वर्तमानपत्रांनी संस्थेच्या विविध वृत्तांना प्रसिध्दी दिल्याबद्दल.
५. शारदाश्रम विद्यामंदिर, दादर यांचे वार्षिक सभेसाठी सभागृह उपलब्ध केल्याबद्दल तसेच सम्राट केटरर्स आर्शिवाद डेकोरेटर्स व मयुर साऊंड सर्व्हीस यांचेही आभार
६. संस्थेस प्रत्यक्ष अप्रत्यक्ष वेळोवेळी मदत करणारे कार्यकर्ते, हितचिंतक व देणगीदार.

२०) श्रध्दांजली :

अहवाल वर्षात दिवंगत झालेल्या सर्व ज्ञात/अज्ञात सभासदांना, देशकार्यार्थ शहीद झालेले सर्व सैन्य दलातील रक्षणकर्ते, सामाजिक/सांकृतिक / राजकीय क्षेत्रातील दिवंगत झालेल्या सर्व मान्यवरांना असोसिएशनच्या वतीने भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात येत आहे.

डॉ. मारूती नलावडे — श्री. कमलाकर क्षीरसागर

(कार्यवाह) — (अध्यक्ष)

## अत्यंत महत्वपूर्ण

***** " संपर्क सहकार्य विकास "

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवा–निवृत्तांना, त्यांच्या कुटुंबियांना वाढते वय, त्रासदायक प्रवास, व्यस्त जीवनशैली अशा अनेकानेक कारणांनी आपली संस्था व निवृत्तीवेतनधारक यांच्यातील संपर्क अवघड होत आहे. संपर्क, मार्गदर्शन, परस्पर सहकार्य सुकर व्हावे यासाठी, आपली संस्था सप्टेंबर २०२२ पासून स्वतःची वेबसाईट (संकेतस्थळ) विकसीत करून, कार्यान्वित करत आहे.

**www.bmpa.co.in**

निश्चित असा आपण सोबत आहोत. सर्वथैव सक्षम (शारिरीक – मानसिक – आर्थिक) हे आपले ध्येय आहे.

## अत्यंत महत्वपूर्ण

****** " सुवर्ण महोत्सव "

आपल्या संस्थेच्या स्थापनेस, ऑक्टोबर/डिसेंबर २०२३ मध्ये ४९ वर्षे पूर्ण होऊन, संस्था ५० व्या म्हणजेच सुवर्ण महोत्सवी वर्षात पदार्पण करत आहे.

संस्थेच्या सुवर्ण महोत्सवाच्या अनुषंगाने काही विशेष कार्यक्रम, उपक्रम यांचे आयोजन करण्यात येणार आहे.

या विषयीच्या आपल्या सूचना, विचार यांचे स्वागत आहे. या उपक्रमात आपणा सर्वांना सहभागी व्हायचे आहे.

सोबत या अविस्मरणीय क्षणांचा अनुभव घेऊ या.

## गुणवत्ताप्राप्त विद्यार्थी/ विद्यार्थीनींचा परितोषिक वितरण समारंभ

* बृहन्मुंबई महानगरपालिका शाळेतील जे विद्यार्थी मार्च/एप्रिल, २०२२ मध्ये घेतलेल्या शालांत परीक्षेत पहिल्या दहा क्रमांकाने उत्तीर्ण झाले आहेत अशा विद्यार्थ्यांचा संस्थेतर्फे सत्कार करण्यात येणार आहे.
* तसेच मार्च/एप्रिल, २०२२ मध्ये घेतलेल्या परीक्षेत (इ.१०वी, १२वी, पदवी, पदविका, पदव्युत्तर पदवी) ज्या सभासदांच्या पाल्यांनी विशेष यश संपादित केले आहे. अशा गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार दि.१६.१२.२०२२ रोजी करण्याचे योजिले आहे. सभासदांना विनंती की, त्यांनी सदर परीक्षेतील निकालपत्रांसह पाल्यांचे अर्ज दि.३१.१०.२०२२ पर्यंत संस्था कार्यालयात पाठवावेत.